**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक:- 11/12/2020**

**अशोक विनायक चेडे, मुद्रांक विक्रेता, रा.शिवाजी नगर, वाशी यांनी 18000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | अशोक विनायक चेडे, मुद्रांक विक्रेता, रा.शिवाजी नगर, वाशी |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.19.11.2020 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय वाशी येथे |
| तपासी अधिकारी | श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 25000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 18000/- रुपये लाचेची मागणी |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदाराचे शेत जमीनीचे खरेदी खताचे काम दुय्यम निबंधक कार्यालयातुन करुन देण्यासाठी |

यातील तक्रारदार यांच्या शेत जमीनीचे खरेदी खताचे काम दुय्यम निबंधक कार्यालयातुन करुन देण्यासाठी यातील आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे 25000/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना मुद्रांक विक्रेते चेडे यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.19.11.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने मुद्रांक विक्रेते चेडे यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष 25000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 18000/- रु लाच रक्कमे ची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे वाशी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद व श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक यांनी त्यांच्या पथकाच्या मदतीने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

**2)** श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

**3) टोल फ्री क्र. 1064,** दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-** dysposmanabad@gmail.com

पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद

Scanned with CamScanner